सं.फौ.ख.क्र. १०५९/२०२३
शासन विरुध्द गणेश
नि.क्र. १२ खाली

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – संजय रामचंद्र तरटे,
वय वर्षे - ५५, कामधंदा - बाजार समिती व्यवसाय,
राहणार – बावधन, तालुका वाई, जिल्हा सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.ए.कदम -**

दि.०७.०५.२०२३ रोजी पोलीसांनी मला शेती उत्पन्न बाजार समिती वाई येथे पंचनामा करण्याकामी बोलाविले होते. त्यावेळी माझ्यासोबत राजेंद्र क्षीरसागर, महेश भोसले हे सुध्दा तेथे हजर होते. कांबळे नावाच्या बाजार समितीच्या शिपायाने त्यावेळी आम्हाला घटनास्थळ दाखविले होते. त्या ठिकाणी बाजारसमितीचे तार कंपाउंड तोडले होते. त्या ठिकाणी आरोपीने त्यांच्या टपरीसाठी बाजार समितीच्या हद्दीतुन तेथे जाण्याकरीता रस्ता केला होता. त्या ठिकाणी पोलीसांनी फोटोसुध्दा काढले होते. आता मला एकुण चार फोटो दाखविण्यात आले. ते तेच असुन ते आर्टीकल ए ते डी वर आहेत. आता मला दि.०७.०५.२०२३ रोजीचा घटनास्थळाचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावरील अ.क्र.२ वर असलेली सही माझी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो पंचनामा **नि.क्र.२३** वर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. जे.व्ही. सुर्यवंशी</u> -**

२. हे म्हणणे खरे आहे की कथीत पंचनामा कार्यवाही कधी सुरु झाली व कधी संपली हे निश्चीत वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला पंचनाम्यावर सही करण्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यातील मजकुर नेमका कुणी लिहला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी कथीत पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की उपरोक्त फोटो कुणी काढले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्याद कुणी दिली त्यांचे नाव मला

सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष कथीत पंचनामा कार्यवाही झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की बाजार समितीच्या तारा जुन्या असल्यामुळे तुटन पडल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या आवारात माझे दुकान आहे. त्या दुकानाचे नाव हॉटेल कॉर्नर असे आहे. त्या दुकानाकरीता मला एकूण चार गाळे देण्यात आले आहेत. तथापि, मला त्यांचे निश्चित असे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. माझ्या त्या दुकानासमोर पत्रा शेड व फलेक्स बोर्ड लावण्याकरीता मी बाजारसमितीची परवानगी घेतली आहे. साक्षीदार सांगतो की, मी त्या पत्राशेडचे वेगळे भाडे देतो. मी ती पावती सादर करु शकतो. साक्षीदार सांगतो की, माझे बाजार समिती वाई येथे एक स्वतःचा गाळा असुन उर्वरीत तीन गाळयांमध्ये मी पोटभाडेकरु आहे. त्याकरीता बाजार समितीची परवानगी असुन मी त्याबाबतचे कागदपत्रे दाखल करु शकतो.

***न्यायालयीन वेळ संपल्यामुळे प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.06.25 12:27:37 +0530

दि.२३.०६.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वाई.